# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १७४** **दिनांक ०१/०७/२०२१**

## घरामध्ये चालणाऱ्या जुगार अड्डयावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची छापा कारवाई

दिनांक २९.०६.२०२१ रोजी रात्री २०.०० वा. सुमारास गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, फ्लॅट नं. ३०२, बिल्डींग नं.११, सेक्टर नं.६, शांती गार्डन, मिरारोड (पुर्व) येथे घरामध्ये जुगार चालू आहे. मिळालेली माहिती वरिष्ठांना कळवून झडती वॉरन्ट प्राप्त करुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने पंचासह २१.०० वा. चे सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला असता, घरामध्ये ०८ स्त्री/पुरुष पैसे लावुन तीन पत्याचा जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले तसेच त्यांचे कब्जात ५२ पत्यांच्या पानाचे दोन कॅट, २६९ पोकर चिप्स व रोख रक्कम २१,८४०/- रु. असे मिळुन आल्याने त्याबाबत सविस्तर पंचानामा करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत पोशि/३६६० केशव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुरनं. ४६१/२०२१ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोशि. ३६६० केशव शिंदे, मपोना. १७८९ यंबर, काशिमिरा पोलीस ठाण्याचे पोशि/६५९ गिरासे, पोशि/२७३५ हरणे यांनी केली आहे.

----oooo----